www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

| प्रश्नपत्रिका क्र. | 327968 |
|---|---|

| कोड : १०१ |
|---|

परीक्षा दिनांक : १४/१२/२०१४

**माध्यम : मराठी**

**महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET)**

**पेपर I (इ. १ली ते इ. ५वी)**

वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.००

बैठक क्रमांक

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

| एकूण गुण | १५० |
|---|---|

| एकूण पृष्ठे | २४ |
|---|---|

## प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.

**सूचना :**

१) प्रश्नपत्रिकेमध्ये सलग एकूण १५० प्रश्न असून ते सोडविण्यासाठी उमेदवारास अडीच तास वेळ देण्यात आलेला आहे. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरुपाचा असून प्रश्नाच्या खाली उत्तराचे पर्याय दिलेले आहेत. उत्तर नोंदविताना चार पर्यायांपैकी बरोबर उत्तर असलेल्या पर्याय क्रमांकाच्या वर्तुळाला काळ्या/निळ्या शाईच्या बॉलपेनने पूर्णपणे रंगवून उत्तर देणे आवश्यक आहे. अर्धवट रंगवलेले वर्तुळ, खाडाखोड अथवा एकाच प्रश्नासाठी दोन उत्तरे दर्शविलेली असतील अशा उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. पेन्सिलीने नोंदविलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.

प्रश्नपत्रिकेमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय प्रश्न आहेत.

| | | | माध्यम |
|---|---|---|---|
| • भाग - A : भाषा १ व २ | - प्रश्न-क्रमांक १ ते ६० | - ६० गुण | इंग्रजी, मराठी |
| • भाग - B : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | - प्रश्न-क्रमांक ६१ ते ९० | - ३० गुण | मराठी |
| • भाग - C : गणित | - प्रश्न-क्रमांक ९१ ते १२० | - ३० गुण | मराठी |
| • भाग - D : परिसर अभ्यास | - प्रश्न-क्रमांक १२१ ते १५० | - ३० गुण | मराठी |

३) एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.

४) प्रश्नाला दिलेले पर्याय अचूक उत्तराच्या सदृश असतात. त्यामुळे सर्वात अचूक उत्तराच्या वर्तुळाला गिरविणे आवश्यक आहे, याची परीक्षार्थीने नोंद घ्यावी.

५) प्रत्यक्ष परीक्षा झाल्यानंतर एक आठवड्याचे आत संभाव्य उत्तरसूची जाहिर करण्यात येईल. प्रश्नपत्रिकेमधील प्रश्नांबाबत प्राप्त आक्षेपांनुसार कोणत्याही कारणामुळे प्रश्न (प्रश्न व पर्यायी उत्तरे) चुकीचे आहेत असे आढळल्यास व परिषदेच्या तज्ञ समितीने ते मान्य केल्यास ते प्रश्न रद्द करून उर्वरित प्रश्नांच्या गुणांवर आधारित तज्ञ समितीने निश्चित केलेल्या निश्चित सूत्रानुसार अचूक प्रश्नांच्या गुणांनुसार पात्रता जाहिर करण्यात येईल.

६) परीक्षार्थीने आपला बैठक क्रमांक त्यांना पुरविलेल्या प्रश्नपत्रिकेवर नोंदवावा.

७) प्रश्नपत्रिकेत कोणत्याही प्रश्नांच्या उत्तराची नोंद करू नये. उत्तरपत्रिकेचा, प्रश्नपत्रिकेचा कोणताही भाग वेगळा करू नये.

८) कच्चे काम करण्यासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटच्या पानावर दिलेल्या कोऱ्या जागेचा वापर करावा.

९) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेचा व उत्तरपत्रिकेचा क्रमांक स्वाक्षरी पटावर लिहिणे आवश्यक आहे.

१०) परीक्षा प्रवेशपत्राची मागणी केल्यास पर्यवेक्षकास दाखवावे. प्रवेशपत्रात दुरुस्ती असल्यास ती करून / नसल्यास तसेच प्रवेशपत्र परीक्षेनंतर पर्यवेक्षकाकडे देऊन पोच घ्यावी व ही पोच पावती जपून ठेवावी.

११) उत्तरपत्रिका देताना उत्तरपत्रिकेची Carbonless प्रत परीक्षार्थीने परीक्षा झाल्यानंतर परत घेऊन स्वाक्षरी पटावर दुसरी स्वाक्षरी करावी. दुसरी स्वाक्षरी नसल्यास त्याने उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे दिलेली नाही असे समजण्यात येईल.

१२) पर्यवेक्षकाच्या सूचनेशिवाय परीक्षागृह सोडू नये.

१३) परीक्षार्थीने परीक्षा चालू असताना अथवा परीक्षा संपल्यानंतर परीक्षेसंबंधी कोणतेही साहित्य परीक्षागृहाबाहेर नेल्यास / नेल्याचे निदर्शनास आल्यास त्याची या परीक्षेतील उमेदवारी रद्द होईल. त्याचबरोबर त्यांचेविरुद्ध भारतीय दंडसंहिता (IPC) अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

Prepp
Your Personal Exams Guide

## भाग - A : इंग्रजी

1. The place where 'tiger' lives is called :
   (1) convent (2) kennel (3) lair (4) stable
2. The 'Noun' form of 'Describe' is :
   (1) Description (2) Distribution (3) Describtion (4) Descripsion
3. Choose grammatically correct sentence from the given sentences :
   (1) Please explain me the problem. (2) Please explain for me the problem.
   (3) Please explain to me the problem. (4) Please explain with me the problem.
4. Complete the statement in the newspaper report under the following heading by choosing correct verb form from the alternatives :
   A cup of coffee cuts risk of diabetes by 7% :
   *"An American study has shown that every extra cup of coffee ______ by 7%."*
   (1) had cut the risk of diabetes (2) will soon cut the risk of diabetes
   (3) cut the risk of diabetes (4) cuts the risk of diabetes
5. The young one of the 'horse' is called :
   (1) fawn (2) colt (3) cub (4) porkling
6. Rearrange given parts of the sentence so as to form the most complete meaningful sentence :
   *Ashoka was successful...*
   P – by the cruelty and horrors of war that he renounced it
   Q – he was so disgusted
   R – in this military operations
   S – and alone among conquerors
   (1) PSQR (2) QPRS (3) RSQP (4) SQPR
7. The cry of the 'owls' is called :
   (1) hoot (2) croak (3) grunt (4) scream
8. Choose correctly spelt word from those given below :
   (1) Hipocryen (2) Hypocrisy (3) Hippocrisy (4) Hypocrasy
9. Name 'Part of Speech' in the given sentence which is underlined :
   *"Generally beauty dwells in form."*
   (1) Common Noun (2) Proper Noun
   (3) Collective Noun (4) Abstract Noun
10. Choose correct alternative from those given below :
    *"Sukumar was ______ first person to arrive."*
    (1) a (2) an (3) no article (4) the

Prepp
Your Personal Exams Guide

**11.** Choose correct preposition in the given sentence :

*"The robbers broke ______ his shop and looted it."*

(1) in (2) open (3) into (4) no preposition

**12.** Choose correct 'Indirect Speech' of the given sentence :

*Sayali said to Ketaki, "Let's take a taxi now".*

(1) Sayali suggested Ketaki that they should take a taxi then.

(2) Sayali told Ketaki they should take a taxi now.

(3) Sayali suggested Ketaki they should take a taxi then.

(4) Sayali suggested Ketaki that we should take a taxi then.

**13.** Choose the most correct 'Degree Sentence' from the given sentences :

(1) Very few boys are so industrious as Abhijeet.

(2) Shivaji was one of the greatest Kings.

(3) Manali was more intelligent than any other women.

(4) No other policies are as good as honesty.

**14.** Identify the underlined clause :

*"Tell me <u>why you did this</u>."*

(1) Adjective Clause (2) Noun Clause

(3) Adverb Clause of Time (4) Adverb Clause of Interrogation

**15.** Choose correct 'No sooner .......... than' sentence of the given sentence :

*"Kedar was frightened when the needle of the compass jumped."*

(1) No sooner was Kedar frightened than the needle of the compass jumped.

(2) No sooner did Kedar frighten than the needle of the compass jumped.

(3) No sooner did the needle of the compass jump than Kedar was frightened.

(4) No sooner Kedar was frightened than the needle of the compass jumped.

**16.** Choose correct 'Passive Voice' sentence of the given sentence :

*"Didn't the fire damage the house ?"*

(1) Didn't the house damaged by the fire ?

(2) Was the house not damaged by the fire ?

(3) Did the house not damaged by the fire ?

(4) Were the house not damaged by the fire ?

**17.** Find out the part which has an error :

*"He is very blind / to read / the smallest of prints. / No error."*

*a* *b* *c* *d*

(1) d (2) c (3) b (4) a

Prepp
Your Personal Exams Guide

**18.** Choose correct 'Synonym' of 'Nasty' :

(1) unpleasant (2) natural (3) genuine (4) emotional

**19.** Choose 'Opposite' of 'Pertinent' :

(1) extraneous (2) paltry (3) appropriate (4) pleasant

**20.** Choose one-word for the given :

*"A man who dances to the tunes of his wife."*

(1) slave (2) chun (3) effeminate (4) henpecked

**21.** Choose correct 'Wh-Question' to get the underlined part as answer :

*"Mrs. Chaitrali grew black lady rose in her garden."*

(1) What Mrs. Chaitrali grew in her garden ?

(2) What were Mrs. Chaitrali grow in her garden ?

(3) What did Mrs. Chaitrali grow in her garden ?

(4) What was Mrs. Chaitrali grow in her garden ?

**22.** Choose correct alternative for the given :

*"An insect which has many legs."*

(1) Verternate (2) Centipede (3) Mammal (4) Herbivores

**23.** Which of the following expresses the past perfect continuous tense ?

(1) He is writing when there was a loud explosion.

(2) He was writing when there was a loud explosion.

(3) He had been writing when there was a loud explosion.

(4) He had writing when there was a loud explosion.

**24.** Choose correct 'Yes/No type question' of the given sentence :

*"Sanjay will have completed his journey."*

(1) Will Sanjay have completed his journey ?

(2) Have Sanjay completed his journey ?

(3) Have Sanjay will completed his journey ?

(4) Will have Sanjay completed his journey ?

**25.** Identify figure of speech in the given line :

*"O, my love's like the melodie."*

(1) Simile (2) Irony (3) Metaphor (4) Pun

*Read the following passage carefully and select the most correct answers of the given questions.* ***[Q. Nos. 26 to 30]***

The villager has customarily been very conservative in his attitude and approach. He is reluctant to change his traditional way of thinking and doing things. His attitude, in many respects, is : 'home-made is best'. For instance, most cattle-farmers in the villages, prefer to feed their cows and buffaloes with a home-mix comprising of local oil-cakes like mustard or cottonseed, pulses, jaggery, salt etc. It takes numerous visits, hard-convincing, daily trials and experiments to convince rural cattle farmer that compound feeds, scientifically formulated, improve yield of milk, without any incremental costs.

The old-age values and attitudes towards caste, creed, women, time and money take time to change. The villager has traditionally been a believer in the philosophy of Karma or Fate. He has found it more convenient to blame his economic destitution, poor living conditions, and straitened social status on 'Bhagya', 'Karma' or 'Fate'. The security that the villagers find in the 'status quo', acts as discentive to change and experiment, in the short run. Many of these antiquated attitudes, value system and outlooks are changing, due to improved levels of awareness and education. However, the rate of change is sluggish. Attitudes that have fossilised over the centuries, do take time to change.

**26.** What does the phrase 'home-made is best' imply ?

(1) People should go in for Swadeshi because it is home-made.
(2) Change for the sake of change is not good.
(3) The best should not be discarded.
(4) Whatever is being practised is better than what is new.

**27.** When will you call a person conservative in his attitude and approach ?

(1) When he would like to try out every new idea before accepting it.
(2) When he sticks to old ways of thinking and doing.
(3) When he solves his problems through tried out methods.
(4) When he imputes motives to change-agents.

**28.** What is the best method to convince average Indian Villager about the superiority of a new cattle-feed ?

(1) Home-visits
(2) Discussion
(3) Field Demonstration
(4) Distribution of related literature

**29.** Which of the following is not the usual reason offered by an average Indian Villager for his poverty ?

(1) It is a result of some of his bad deeds committed in this or the previous birth.
(2) It is God's will.
(3) It is because of his resistance to new ideas.
(4) It is his destiny.

**30.** Why does a villager feel secure in maintaining 'status quo' ?

(1) Because change is seldom for the better.
(2) Because whatever is known should be the best.
(3) Because of the imagined risk involved in trying a new approach.
(4) Because too many people go without advising him.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## भाग - A : मराठी

*खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न-क्रमांक 31 ते 34ची उत्तरे पर्यायातून निवडा :*

आजच्या काळात सामाजिक व आर्थिक विकासाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. व्यक्ती व समाजात परिवर्तन घडवणारेही ते एक साधन मानले जाते. बर्ट्रान्ड रसेलनाही असेच वाटत होते, की शिक्षणाने व्यक्ती बदलेल आणि व्यक्ती बदलली की समाजही बदलेल. प्रारब्धवादी समाजव्यवस्थेला परिवर्तन कधीही मान्य नसते. स्थितिशीलता ही तिची आदिप्रेरणा असते. आधुनिक काळातील गतिमानता या स्थितिशीलतेला हादरा देते. गतिमानता हे आधुनिक काळाचे मानचिन्ह आहे. त्याचा परिणाम शिक्षणासारख्या एका महत्त्वाच्या घटकावरही झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचे साधन मानले.

शिक्षण हे माणसाला विचार देते. त्याच्या बुद्धीची जोपासना करते. त्याच्या अस्तित्वाची त्याला जाणीव करून देते. अस्तित्वाची जाणीव ही मानवी जीवनातील मूलभूत जाणीव आहे. डॉ. बाबासाहेब, तिचे महत्त्व पटवून देताना म्हणतात की, उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जीवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.

**31.** आधुनिक काळाचे मानचिन्ह कोणते ?

(1) परिवर्तन (2) स्थितिशीलता (3) गतिमानता (4) प्रारब्ध

**32.** मानवी जीवनातील मूलभूत जाणीव कोणती ?

(1) बुद्धीची जोपासना (2) अस्तित्वाची जाणीव
(3) शिक्षणाची जाणीव (4) शरीराचे पोषण

**33.** शिक्षण हे खालीलपैकी कोणत्या प्रकारचे साधन नाही ?

(1) स्थितिशीलतेचे (2) सामाजिक व आर्थिक विकासाचे
(3) व्यक्ती व सामाजिक परिवर्तनाचे (4) सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचे

**34.** शिक्षणाच्या अभावी माणूस काय होईल ?

(1) प्रारब्धवादी (2) अल्पायुषी (3) परिवर्तनवादी (4) दुसऱ्याचा गुलाम

**35.** 'ग्राह्य' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) त्याज्य (2) स्वीकारार्ह (3) गृहित (4) घेण्यास योग्य

**36.** "माधव भित्रा नाही." या वाक्याचे अर्थ न बदलता होणारे होकारार्थी वाक्य कोणते ?

(1) माधव भित्रा आहे. (2) माधव शूर आहे.
(3) माधव शूर नाही, असे नाही. (4) माधव भ्याड आहे.

**37.** 'पिसू' या शब्दाचे योग्य अनेकवचन कोणते ?

(1) पिसूवा (2) पिसे (3) पिसवा (4) पिसा

**38.** पुढीलपैकी कोणत्या वाक्यातील क्रियापद सकर्मक आहे ?

(1) मी रस्त्यात पडलो. (2) आरोही लाडू खाते.
(3) आज भाऊबीज आहे. (4) सुनील उदया जाईल.

Prepp
Your Personal Exams Guide

39. 'डोंगराएवढी हाव, तिळाएवढी धाव' या म्हणीचा योग्य अर्थ कोणता ?
   (1) खूप हाव असणे
   (2) महत्त्वाकांक्षा असणे
   (3) महत्त्वाकांक्षा मोठी पण ती पूर्ण करण्याची कुवत नसणे
   (4) डोंगर व तिळाची तुलना करणे

40. "कोणी कोणास हसू नये." या वाक्यातील अधोरेखित सर्वनामाचा प्रकार कोणता ?
   (1) प्रश्नार्थक (2) दर्शक (3) संबंधी (4) अनिश्चित

41. पुढीलपैकी गुणविशेषणाचे उदाहरण कोणते ?
   (1) सर्व मुली (2) खूप लोक (3) काळा कुत्रा (4) दोन्ही भाऊ

42. "सारे बळ एकवटून त्याने आकाशात झेप घेतली." या वाक्याचा काळ ओळखा :
   (1) साधा भूतकाळ (2) साधा वर्तमानकाळ (3) पूर्ण भविष्यकाळ (4) पूर्ण वर्तमानकाळ

43. आई म्हणाली, "इच्छा असो-नसो, प्रपंच मांडला की माणूस आपोआपच स्वार्थी होतो." या वाक्यात किती विरामचिन्हे आली आहेत ?
   (1) दोन (2) तीन (3) चार (4) पाच

44. पुढीलपैकी प्रत्यय जोडून तयार झालेला शब्द ओळखा :
   (1) उपहार (2) अवजड (3) प्रतिकार (4) झुबकेदार

45. 'पती' चा समानार्थी शब्द ओळखा :
   (1) कांता (2) भर्ता (3) दारा (4) जाया

*पुढील कविता वाचून त्याखालील प्रश्न-क्रमांक 46 ते 49ची उत्तरे पर्यायातून निवडा :*

ओढाळ वासरू रानी आले फिरू
कळपाचा घेरू सोडूनिया ।
    कानामध्ये वारे भरूनिया न्यारे
    फेर धरी फिरे रानोमाळ ।
मोकाट मोकाट अफाट अफाट
वाटेल ती वाट धावू लागे ।
    विसरूनी भान भूक नि तहान
    पायाखाली रान घाली सारे ।
थकूनिया खूप सरता हुरूप
आठवे कळप तयालागी ।
    फिरू जाता मागे दूर जाऊ लागे
    आणखीच भागे भटकत ।
पडता अंधारू लागले हंबरू
माय ! तू लेकरू शोधू येई !

46. वासरू केव्हा हंबरू लागले ?
   (1) मोकाट धावताना (2) भूक तहान लागल्यावर
   (3) अंधार पडू लागल्यावर (4) थकल्यानंतर

Prepp
Your Personal Exams Guide

**47.** वासरू कळपातून कुठे गेले ?

(1) रानात (2) भरकटत दूर (3) गायीकडे (4) गोठ्यात

**48.** कवितेतील 'ओढाळ' शब्दाचा अर्थ काय ?

(1) बंदिस्त (2) उनाड (3) मोकळा (4) उत्साही

**49.** खूप थकल्यानंतर वासराला कशाची आठवण झाली ?

(1) भुकेची (2) तहानेची (3) गायीची (4) कळपाची

**50.** पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा :

(1) चालिरिति (2) चालीरीती (3) चालीरिती (4) चालीरिति

**51.** पुढीलपैकी अर्थाच्या दृष्टीने गटात न बसणारा शब्द ओळखा :

(1) घमेंड (2) गर्व (3) डौलदारपणा (4) अहंता

**52.** 'कोणालाही कळू न देता' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द कोणता ?

(1) बिनतक्रार (2) बिनबोभाट (3) बिनधोक (4) बिनधास्त

**53.** *"बँकेतील हिशोबात गडबड झाल्याचे मॅनेजरला कळाल्याने तेथील कारकुनाने ..............."* योग्य वाक्प्रचार वापरून वाक्य पूर्ण करा.

(1) तोंड घशी पाडणे (2) तोंडात शेण घालणे

(3) तोंड काळे करणे (4) तोंडचे पाणी पळणे

**54.** "तिने पतीला मोठ्या पानावर आंबोळ्या वाढल्या." या वाक्यातील अधोरेखित अव्यय कोणत्या प्रकारचे आहे ?

(1) क्रियाविशेषण (2) उभयान्वयी (3) शब्दयोगी (4) केवलप्रयोगी

**55.** धाकट्या भावाला परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे त्याला लिहिलेले पत्र कोणत्या प्रकारचे असेल ?

(1) चौकशीपत्र (2) अभिनंदनपत्र (3) कौटुंबिक पत्र (4) तक्रार पत्र

**56.** 1998 साली परळी वैजनाथ येथे भरलेल्या 71व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ?

(1) द. मा. मिरासदार (2) वि. द. घाटे

(3) मारुती चितमपल्ली (4) ना. सं. इनामदार

**57.** मराठी भाषेतील 'आद्य चरित्रकार' म्हणून कोण ओळखले जाते ?

(1) चक्रधर स्वामी (2) म्हाइंभट (3) नागदेवाचार्य (4) आऊसा

**58.** पुढीलपैकी पुल्लिंगी शब्द ओळखा :

(1) ग्रंथ (2) पोथी (3) पुस्तक (4) वही

**59.** 'केशवकुमार' या टोपणनावाने लेखन करणाऱ्या लेखकांचे नाव काय ?

(1) प्र. के. अत्रे (2) कृ. के. दामले (3) रा. ग. गडकरी (4) वि. वा. शिरवाडकर

**60.** पुढीलपैकी कोणता वर्ण कठोर वर्ण आहे ?

(1) प् (2) ब् (3) भ् (4) ध्

Prepp
Your Personal Exams Guide

## भाग - B : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

**61.** मानसशास्त्रज्ञ व त्यांच्या मानसशास्त्राच्या व्याख्या यानुसार योग्य जोड्या लावा :

| मानसशास्त्रज्ञ | | व्याख्या |
|---|---|---|
| (अ) ॲरिस्टॉटल | – | (i) बोधावस्थेचे शास्त्र |
| (ब) मॅकड्युगल | – | (ii) मानव व मानवेतर प्राण्यांच्या वर्तनाचे शास्त्र |
| (क) विल्यम वुंट | – | (iii) आत्म्याचे शास्त्र |
| (ड) मॉर्गन, किंग, रॉबिन्स | – | (iv) मानवी मनाचे अनुभवमिश्रित व वर्णनात्मक शास्त्र |

(1) (अ) – (iii), (ब) – (iv), (क) – (i), (ड) – (ii)
(2) (अ) – (iv), (ब) – (ii), (क) – (iii), (ड) – (i)
(3) (अ) – (i), (ब) – (iii), (क) – (ii), (ड) – (iv)
(4) (अ) – (ii), (ब) – (iv), (क) – (i), (ड) – (ii)

**62.** खालील मर्यादांपैकी प्रायोगिक पद्धतीच्या कोणत्या योग्य मर्यादा आहेत ?

(अ) प्रयोज्याचे आंतरिक घटक नियंत्रित असतात.
(ब) ही पद्धती अधिक खर्चिक व वेळखाऊ आहे.
(क) कृत्रिम प्रतिसादाची शक्यता असते.
(ड) प्रयोजक व्यक्ती तज्ज्ञ असणे आवश्यक असते.

(1) (अ), (ब) आणि (ड)
(2) (अ), (ब) आणि (क)
(3) (ब), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

**63.** खालील विधानांपैकी शिक्षणप्रक्रियेची योग्य वैशिष्ट्ये कोणती ?

(अ) शिक्षण ही त्रिकेंद्रात्मक प्रक्रिया आहे.
(ब) शिक्षण ही स्वयंस्फूर्त प्रक्रिया आहे.
(क) शिक्षण ही नैसर्गिक व सहज प्रक्रिया आहे.
(ड) शिक्षण ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे.

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (ब), (क) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

**64.** एका वेळी एक पायरी, ताबडतोब पडताळा, सक्रिय प्रतिसाद ही तत्त्वे असलेले क्रमन्वित अध्ययन खालीलपैकी कोणत्या उपपत्तींवर आधारलेले आहे ?

(1) अभिजात अभिसंधान
(2) प्रयत्नप्रमाद उपपत्ती
(3) साधक अभिसंधान
(4) मर्मदृष्टी अध्ययन

**65.** किशोरावस्थेतील मुलांच्या विकासासाठी शिक्षकांनी खालीलपैकी कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे ?

(अ) अक्षरांना योग्य वळण लावणे.
(ब) बिनचूक शुद्ध उच्चारांसहित पाठांतर करणे.
(क) गट न करता वैयक्तिक कामाची जबाबदारी देणे.
(ड) मुलांच्या सर्जनशीलता वाढीसाठी उपक्रम राबविणे.

(1) (अ), (ब), (क), (ड), सर्व
(2) (अ), (ब) आणि (ड)
(3) (ब), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब) आणि (क)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

66. कुशाग्र बुद्धीमत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षिकेने खालीलपैकी कोणत्या गोष्टी करणे उपयुक्त ठरेल ?
(अ) इयत्ता गाळून वरच्या वर्गात प्रवेश द्यावा.
(ब) वर्गाध्यापनात त्यांचा सहभाग वाढवावा.
(क) स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करावा.
(ड) उन्हाळी शाळा सुरु कराव्यात.
(1) (अ), (ब) आणि (ड)
(2) (ब), (क) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

67. प्रयत्नप्रमाद पद्धतीच्या संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत ?
(अ) या पद्धतीने अध्ययन करताना प्रगती अगदी सावकाश होते.
(ब) अनावश्यक हालचालींमुळे अधिक श्रम होतात.
(क) या पद्धतीत मिळविलेले यश हा पुष्कळवेळा शुद्ध योगायोग असतो.
(ड) संपादित कौशल्ये दुसऱ्या परिस्थितीत सहज संक्रमित होतात.
(1) (अ), (ब) आणि (ड)
(2) (ब), (क) आणि (ड)
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

68. खाली दिलेले भावनिक बुद्धीमत्तेचे पैलू व त्यांचे स्पष्टीकरण यांच्या योग्य जोड्या लावा :
(अ) आत्मभान – (i) स्वत:ची बलस्थाने जाणणे
(ब) अभिप्रेरण – (ii) समन्वय राखणे
(क) सहसंवेदना – (iii) कार्यप्रवृत्त करणारी शक्ती
(ड) सामाजिक कौशल्ये – (iv) दुसऱ्या व्यक्तीच्या भूमिकेशी एकरुप होणे
(1) (अ) – (i), (ब) – (iv), (क) – (ii), (ड) – (iii)
(2) (अ) – (i), (ब) – (iii), (क) – (iv), (ड) – (ii)
(3) (अ) – (iv), (ब) – (i), (क) – (ii), (ड) – (iii)
(4) (अ) – (i), (ब) – (ii), (क) – (iii), (ड) – (iv)

69. बुद्धीमत्तेची व्याख्या करताना विल्यम जेम्स यांनी खालीलपैकी कोणत्या घटकावर भर दिला आहे ?
(1) नव्या परिस्थितीशी समायोजन
(2) विचारांचे उपयोजन
(3) तुटक भागाचे संयोजन
(4) अध्ययन क्षमतांचे संयुक्त संघटन

70. अवबोध आणि प्रतिमा यासंदर्भातील खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत ?
(अ) अवबोध व्यक्तिनिष्ठ तर प्रतिमा वस्तुनिष्ठ असते.
(ब) प्रतिमा ही अवबोधाची नक्कल असते.
(क) अवबोध तुटक नसतात प्रतिमेत तुटकपणा जाणवतो.
(ड) प्रतिमा अवबोधापेक्षा अधिक अस्थिर असते.
(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (अ), (क) आणि (ड)
(3) (ब), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

71. खाली दिलेल्या विधानांपैकी अग्रत संघटक प्रतिमानाविषयी कोणती विधाने योग्य आहेत ?

(अ) अग्रत संघटन प्रतिमानास व्याख्यान अध्यापन प्रतिमान असेही म्हणतात.

(ब) एखाद्या मुद्याचे विवेचन करून तो स्पष्ट करता येतो.

(क) अग्रत संघटक सादर केल्यानंतर हेतू स्पष्ट केला जातो.

(ड) जुन्या माहितीचा अनावश्यक भाग वगळला जातो.

(1) (अ) आणि (ब) (2) (ब) आणि (ड) (3) (ब) आणि (क) (4) (अ) आणि (ड)

72. कोणत्या शास्त्रज्ञाने "अध्ययन संक्रमण हे केवळ विषयाच्या सारखेपणावर अवलंबून नसून तत्त्वे शोधून सामान्यीकरण करणे यांवरही अवलंबून आहे" या मुद्यावर भर दिला :

(1) डब्ल्यू. सी. बॅग्ले (2) सी. एच. जड्ड (3) थॉर्नडाईक (4) जेरॉम ब्रूनर

73. "चित्रकला, हस्तकला या विषयांच्या अभ्यासात व्यवस्थितपणा, टापटीप, सौंदर्य पाहणारे विद्यार्थी, तो तास संपल्यावर सर्व वर्गभर कचरा करीत निघून जातात." हे विधान अध्ययन संक्रमणाच्या कोणत्या उपपत्तीशी संबंधित आहे ?

(1) समान घटक उपपत्ती (2) द्विभागीय संक्रमण

(3) सामान्यीकरणाची उपपत्ती (4) सहेतुक व ध्येयनिष्ठ उपपत्ती

74. 'विस्मरण' ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. पुढीलपैकी विस्मरणाबाबत कोणती विधाने सत्य आहेत ?

(अ) अभ्यासानंतर मध्यांतरामध्ये अनेक गोष्टी केल्यावर विस्मरण होते.

(ब) अचूक प्रत्यावहन व प्रत्याभिज्ञान विस्मरणावर साधक परिणाम करतात.

(क) अभ्यासानंतर झोप घेतल्यास विस्मरण होते.

(ड) जाणीवपूर्वक दमन केल्यास विस्मरण होते.

(1) (अ) आणि (ब) (2) (अ) आणि (क) (3) (अ) आणि (ड) (4) (क) आणि (ड)

75. अध्यापनाचे यश अध्यापनात निर्माण केल्या जाणाऱ्या प्रेरणेच्या प्रमाणात असते, म्हणजेच अध्ययन हे प्रेरणेवर अवलंबून असते. हे खालीलपैकी कोणत्या विधानांवरुन सिद्ध होते ?

(अ) प्रेरणा ही शक्ती असून ती वर्तनाला दिशा देते.

(ब) प्रेरणेमध्ये सातत्य, दिग्दर्शन, विविधता, निवड, स्वस्थता असते.

(क) कोणत्याही प्रेरणेची पूर्तता एकाच मार्गाने होते.

(ड) प्रेरणेमुळे शारीरिक व मानसिक समतोल साधला जातो.

(1) (ब), (क) आणि (ड) (2) (अ), (ब) आणि (ड)

(3) (अ), (ब) आणि (क) (4) (अ), (क) आणि (ड)

76. "व्यक्तिला लहानपणी एखाद्या शिक्षिकेने शिकविलेली कविता, तेव्हाचा प्रसंग जसाच्या तसा खूप वर्षांनी आठवितो", हे उदाहरण कोणत्या प्रकारच्या कल्पनेचे आहे ?

(1) रचनात्मक कल्पना (2) अनुकरणात्मक कल्पना

(3) स्वैर कल्पना (4) पुनरुत्पादित कल्पना

Prepp
Your Personal Exams Guide

77. खाली दिलेल्या संकल्पना तयार होण्याच्या टप्प्यांचा योग्य क्रम लावा :
(अ) वस्तू किंवा प्राण्याचे प्रत्यक्ष ज्ञान होणे.
(ब) गुणवैशिष्ट्याचे सामान्यीकरण करणे.
(क) गुणवैशिष्ट्ये ध्यानात येणे.
(ड) संकल्पना तयार करणे.
(इ) अमूर्त रूप देणे.
(1) (अ), (क), (ड), (ब), (इ)
(2) (अ), (क), (ब), (इ), (ड)
(3) (अ), (ब), (क), (ड), (इ)
(4) (अ), (ड), (क), (ब), (इ)

78. खालीलपैकी अध्ययन संक्रमणाबाबत कोणती विधाने सत्य आहेत ?
(अ) मानसिक शक्तीचा विकास एकदा झाला की अध्ययन संक्रमण आपोआप घडून येते.
(ब) एका क्रियेचा सराव केला तर दुसरी क्रिया सोपी होत नाही.
(क) दोन परिस्थितीमध्ये साम्य जेवढे अधिक तेवढे अध्ययन संक्रमण अधिक होते.
(ड) अध्ययन संक्रमण होण्यासाठी कृती सहेतुक व ध्येयनिष्ठ असावी लागते.
(1) (अ), (ब), (क), (ड), सर्व
(2) (ब), (क) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब) आणि (क)

79. खालीलपैकी व्याख्यान पद्धती संदर्भातील कोणते विधान असत्य आहे ?
(1) अवधान केंद्रीकरण होते.
(2) कमी वेळात जास्त अध्यापन करता येते.
(3) तत्त्वे, सिद्धांत व कठीण विषय मांडण्यासाठी उपयोग करता येतो.
(4) दुर्मिळ माहिती सहज देता येते.

80. खालीलपैकी कोणते अनुवंशासंबंधीचे नियम आहेत ?
(अ) साधर्म्याचा नियम
(ब) वैविध्याचा नियम
(क) पुनरावृत्तीचा नियम
(ड) परागतीचा नियम
(1) (ब), (क) आणि (ड)
(2) (अ), (क) आणि (ड)
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (अ), (ब) आणि (ड)

81. व्यक्तिविकासासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?
(1) विकासावर वातावरणापेक्षा अनुवंशाचा अधिक प्रभाव असतो.
(2) विकासावर अनुवंशापेक्षा वातावरणाचा अधिक प्रभाव असतो.
(3) विकासावर अनुवंश आणि परिसर यांचा पूरक प्रभाव असतो.
(4) विकासावर अनुवंशाने संक्रमित झालेल्या गुणदोषांचा परिणाम होत नाही.

Prepp
Your Personal Exams Guide

**82.** कुमारावस्थेतील मानसिक व भावनिक विकासासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान असत्य आहे ?

(1) या वयातील मुले आदर्शाच्या शोधात असतात.

(2) या वयात भिन्नलिंगी आकर्षण वाढते.

(3) या वयात शब्दसंपत्ती वाढविण्याकडे कल असतो.

(4) या वयात मूले बंडखोर होतात.

**83.** खाली दिलेल्या अध्यापन प्रतिमानांची कुले व त्याअंतर्गत येणारी अध्यापन प्रतिमाने यांच्या योग्य जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) ज्ञानप्रक्रियाकरण प्रतिमाने | – | (i) | न्यायतत्त्व शास्त्रीय शोध प्रतिमान |
| (ब) व्यक्तिगत विकास प्रतिमाने | – | (ii) | निसंवेदनक्षमता प्रतिमान |
| (क) सामाजिक आंतरक्रिया प्रतिमाने | – | (iii) | सर्जनात्मक प्रतिमान |
| (ड) वर्तन परिवर्तन प्रतिमाने | – | (iv) | जीवशास्त्रीय पृच्छा प्रतिमान |

(1) (अ) – (iv), (ब) – (iii), (क) – (i), (ड) – (ii)

(2) (अ) – (i), (ब) – (ii), (क) – (iii), (ड) – (iv)

(3) (अ) – (iii), (ब) – (ii), (क) – (i), (ड) – (iv)

(4) (अ) – (iv), (ब) – (i), (क) – (ii), (ड) – (iii)

**84.** खाली दिलेल्या उद्दिष्टांपैकी लैंगिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये कोणती ?

(अ) लैंगिकतेविषयी असणारे अज्ञान दूर करणे.

(ब) प्रजोत्पादन संस्थेच्या कार्याची योग्य माहिती देणे.

(क) मुलांना कुटुंबसंस्थेच्या कार्याची माहिती देणे.

(ड) निकोप, सुदृढ शरीरस्वास्थ्यासाठी मार्गदर्शन करणे.

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (अ), (ब) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

**85.** लेखी परीक्षेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने खालीलपैकी कोणती बाब उपयुक्त ठरणार नाही ?

(1) दीर्घोत्तरी प्रश्नांचे प्रमाण कमी करणे.

(2) वार्षिक परीक्षेला महत्त्व देणे.

(3) गुणदान योजना व नमूना उत्तर सूची यांची सोय करणे.

(4) उत्तरपत्रिकेवर बारकोडचा उपयोग करणे.

**86.** खालीलपैकी कोणती उदाहरणे 'मूर्ताकडून अमूर्ताकडे' या अध्यापन सूत्रावर आधारित आहेत ?

(अ) भूगोल विषयात नकाशाचा वापर करणे.

(ब) विद्यार्थ्यांना थोर नेत्यांची चरित्रे सांगणे.

(क) निसर्गचित्र शिकविताना चित्र दाखविणे.

(ड) कवितेचे स्पष्टीकरण करणे.

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (ब) आणि (क)
(3) (अ) आणि (क)
(4) (ब), (क) आणि (ड)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**87.** खालील मूल्यमापनाच्या साधनांमधील कोणती साधने निरीक्षण तंत्रासाठी वापरतात ?

(अ) पडताळा सूची | (ब) पदनिश्चयन श्रेणी

(क) व्यक्तिमत्त्व प्रश्नावली | (ड) प्रासंगिक नोंदी

(1) (ब), (क) आणि (ड) | (2) (अ), (ब) आणि (क)

(3) (अ), (ब) आणि (ड) | (4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

**88.** अध्यापन प्रतिमानाच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान असत्य आहे ?

(1) अध्यापन प्रतिमानामध्ये सुयोग्य शैक्षणिक कृती व वातावरण निर्मिती विषयी मार्गदर्शन असते.

(2) अध्यापन प्रतिमानामध्ये आधारभूत मानसशास्त्रीय सिद्धांतांचा अंतर्भाव असेलच असे नाही.

(3) अध्यापन प्रतिमानाचा वापर करताना शिक्षकाची भूमिका ताठर नसते.

(4) अध्यापन प्रतिमानामध्ये उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मार्ग दर्शविलेले असतात.

**89.** खालील आक्षेपांपैकी बालोद्यान पद्धतीवर घेतलेला कोणता आक्षेप असत्य आहे ?

(1) शिक्षिका म्हणेल तेच विद्यार्थ्यांना करावे लागते.

(2) साधनांच्या माध्यमातून मुलांना शिक्षविणे अयोग्य आहे.

(3) स्वयंशिक्षणाचा पुरेसा वाव मिळत नाही.

(4) मुलांना खूप स्वातंत्र्य मिळते.

**90.** खालीलपैकी कोणती अध्यापनाची तत्त्वे आहेत ?

(अ) सहनशीलता | (ब) व्यक्तिगत फरक

(क) लोकशाही प्रधानता | (ड) योजनाबद्धता

(1) (अ), (क) आणि (ड) | (2) (ब), (क) आणि (ड)

(3) (अ), (ब) आणि (क) | (4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

## भाग - C : गणित

**91.** खालीलपैकी जोडमूळ संख्यांचा पर्याय कोणता ?

(1) 129, 131 (2) 139, 141 (3) 179, 181 (4) 159, 161

**92.** 13 ते 88 या संख्यांमधील सम संख्या आणि विषम संख्या यांच्या बेरजेतील फरक किती ?

(1) 38 (2) 39 (3) 37 (4) 40


**93.** $5^{-2}$ ही स्थानिक किंमत असणारा अंक खालील पर्यायांपैकी कोणत्या संख्येत आहे ?

(1) 8.645 (2) 25.804 (3) 0.485 (4) 14.568

**94.** स्वराजचा सातवा वाढदिवस 13 डिसेंबर, 2014 ला शनिवारी आहे; तर त्याच्या जन्मदिवसाचा वार कोणता ?

(1) गुरुवार (2) शुक्रवार (3) शनिवार (4) रविवार

**95.** खालील आयताकृतीतील एकरूप कोनांच्या जोड्या किती ?



(1) 6 (2) 12 (3) 18 (4) 20

www.prepp.in

**96.** दोन मीटर उंची व 70 सेमी. त्रिज्या असलेली वृत्तचिती आकाराची पाण्याची टाकी एका नळाने अर्ध्या तासात $^1/_8$ भाग भरते. याप्रमाणे आणखी दोन तास टाकी भरल्यानंतर उर्वरित भागात किती लिटर पाणी मावेल ?

(1) 1925 (2) 1155 (3) 1540 (4) 770

**97.** काही पेट्यांत समान संख्येत पुस्तके ठेवायची आहेत. प्रत्येक पेटीत 28 किंवा 12 किंवा 16 पुस्तके ठेवली. प्रत्येक वेळी शेवटच्या पेटीत 3 पुस्तके कमी पडतात, तर पुस्तकांची एकूण संख्या खालील पर्यायांपैकी किती असू शकेल ?

(1) 1011 (2) 672 (3) 1341 (4) 361

**98.** 12 वस्तूंची विक्री किंमत 15 वस्तूंच्या खरेदी किंमतीएवढी आहे, तर या व्यवहारातील नफा किंवा तोटा किती ?

(1) शे. 25 नफा (2) शे. 20 नफा (3) शे. 25 तोटा (4) शे. 20 तोटा

**99.** एका धावण्याच्या शर्यतीत चार स्पर्धकांनी पूर्ण केलेले अंतर खालील पर्यायांत दर्शविलेले आहे. त्यातील सर्वाधिक अंतर कोणते ?


(1) 115.28 हेक्टो मी. (2) 90270 डेसि. मी.

(3) 1272.1 मी. (4) 727.63 डेका मी.

**100.** एका घड्याळातील मिनिटकाटा व तासकाटा यांच्यात सकाळी 8 ते दुपारी 12 वाजेपर्यंत होणाऱ्या काटकोनांची संख्या संध्याकाळी 4 ते 6 वाजेपर्यंत होणाऱ्या काटकोनांच्या संख्येपेक्षा कितीने जास्त असेल ?

(1) तीन (2) एक (3) चार (4) दोन

**101.** खालील आकृतीत दाखविल्या प्रमाणे वर्तुळाकृती हिरवळीच्या जागेवर □ABCD असे आयाताकृती मैदान तयार केले. त्यावेळी मैदानाची रुंदी जास्तीत जास्त 10.5 मी. झाली. m(कंस DxC) = 60° असेल, तर वर्तुळाकृती जागेला चार पदरी कुंपण घालण्यासाठी एकूण किती मीटर काटेरी तार लागेल ?




(1) 99 (2) 264 (3) 132 (4) 63

**102.** 6, 0, 7 आणि 3 यातील प्रत्येक अंक एकेकदाच वापरून चार अंकी जास्तीत जास्त किती सम संख्या तयार होतील ?

(1) 24 (2) 10 (3) 18 (4) 12

www.prepp.in

**103.** दोन संख्यांच्या बेरजेचा वर्ग 3969 असून त्याच दोन संख्यांचा गुणाकार 972 आहे, तर त्या संख्यांतील फरक किती ?

(1) 9 (2) 36 (3) 69 (4) 99


**104.** 92 ही संख्या 83 वेळा घेऊन गुणाकार केल्यास गुणाकार संख्येच्या एकक स्थानी कोणता अंक असेल ?

(1) 2 (2) 4 (3) 8 (4) 6

**105.** एका वर्तुळावरील सात बिंदू परस्परांशी एकेकदा जोडण्यासाठी चार रेषाखंड काढलेले आहेत, तर जास्तीत जास्त आणखी किती रेषाखंड काढता येतील ?


(1) 7 (2) 42 (3) 21 (4) 17

**106.** खालील भूखंडाच्या आकृतीचे निरीक्षण करून क्षेत्रफळ काढा : (PQ ∥ SR)




(1) 632 मी$^2$ (2) 316 मी$^2$ (3) 158 मी$^2$ (4) 79 मी$^2$

**107.** खालील आकृतीत ΔABC हा समभुज त्रिकोण आहे, त्यावरून x° = किती ?




(1) 30° (2) 45° (3) 50° (4) 60°

**108.** $(-0.25) + (-0.5) \times 2\frac{2}{5} \div \frac{4}{5}$ = किती ?

(1) (–1.25) (2) (–1.75) (3) $1\frac{1}{4}$ (4) $1\frac{3}{4}$

**109.** योगेश मोटार सायकलने ताशी 45 कि.मी. वेगाने काही वेळात 270 कि.मी. अंतर प्रवास करतो. मोटार सायकलचा ताशी वेग पूर्वीच्या $\frac{2}{9}$ पटीने वाढविला, तर तो तेवढ्याच वेळात किती प्रवास करेल ?

(1) 60 कि.मी. (2) 330 कि.मी. (3) 180 कि.मी. (4) 390 कि.मी.

Prepp
Your Personal Exams Guide

**110.** खालील पर्यायांपैकी कोणती संख्या 36 ने विभाज्य नाही ?

(1) 7704 (2) 1116 (3) 9756 (4) 9944

**111.** एका शेतातील विहिरीवरील पाण्याचा पंप पहिल्या दिवशी 3 तास 48 मिनिटे आणि दुसऱ्या दिवशी 6.2 तास सुरु होता; तर दोन्ही दिवसांतील पंप सुरु असण्याच्या कालावधीतील फरक खालीलपैकी किती ?

(अ) 2.4 तास (ब) 2 तास 22 मिनिटे

(क) 144 मिनिटे (ड) 142 मिनिटे

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) फक्त (अ) किंवा (क) (4) फक्त (ब) किंवा (ड)

**112.** एका घनाकृती केकचे एकूण पृष्ठफळ 1944 से.मी.$^2$. आहे. तो कापून इष्टिकाचिती आकाराचे समान चार भाग तयार केले; तर पूर्वीच्या केकच्या तुलनेत त्याच्या सर्व तुकड्यांचे घनफळ आणि एकूण पृष्ठफळ यांबाबत खालीलपैकी कोणते बदल दिसून येतील ?

(अ) पृष्ठफळ तेवढेच असेल. (ब) घनफळ तेवढेच असेल.

(क) पृष्ठफळ 1296 सेमी$^2$ ने वाढेल. (ड) घनफळ 5832 सेमी$^3$ असेल.

(1) फक्त (अ), (ब) आणि (क) (2) फक्त (ब), (क) आणि (ड)

(3) फक्त (अ), (क) आणि (ड) (4) चारही (अ), (ब), (क) आणि (ड)

**113.** पाच वर्षांपूर्वी सियाचे वय हिमांशूच्या वयाच्या सव्वापट होते. आणखी पाच वर्षानंतर हिमांशूचे वय सियाच्या वयाच्या $\frac{6}{7}$ पट असेल; तर दोघांच्या आजच्या वयांची बेरीज किती वर्षे असेल ?

(1) 45 (2) 65 (3) 55 (4) 75

**114.** $$\frac{(8.3 \times 1.5) - (2.7 \times 1.5) - (8.3 \times 2.7) + (8.3 \times 8.3)}{(8.3 + 1.5)(8.3 - 2.7)} = \text{किती ?}$$

(1) 0 (2) 9.8 (3) 5.6 (4) 1

**115.** कारागीर बांबूच्या तीन शिड्या बनवित आहे. 50 सेमी. अंतरावर एक याप्रमाणे प्रत्येक शिडीला 11 पायऱ्या लावल्या; तर त्या शिड्या बनविण्यासाठी पायऱ्यांशिवाय लागणाऱ्या बांबूंची एकूण लांबी किती मीटर असेल ?

(1) 33 (2) 36 (3) 30 (4) 18

**116.** माधवरावांकडे असलेल्या रकमेतील काही रक्कम बचत खात्यात ठेवली. त्यांनी उर्वरित $\frac{3}{4}$ रकमेपैकी $\frac{3}{5}$ रक्कम घरखर्चासाठी आणि $\frac{1}{3}$ रक्कम मुलांच्या शैक्षणिक फीसाठी दिली. तेव्हा त्यांच्याजवळ रु. 1,200 शिल्लक राहिले; तर त्यांनी बचत खात्यात किती रक्कम ठेवली ?

(1) रु. 10,800 (2) रु. 6,000 (3) रु. 18,000 (4) रु. 12,000


(1245 – 405) –

www.prepp.in

**117.** एक वस्तू 1,320 रुपयास विकून जितका नफा होतो, त्याच्या दीडपट तोटा 1,145 रुपयास विकल्याने होतो. यावरुन त्या वस्तूची मूळ किंमत किती ?

(1) रु. 1,250 (2) रु. 1,285 (3) रु. 1,215 (4) रु. 1,180

*एका गृहसंकुलातील वाहतुकीची साधने वापरणाऱ्या व्यक्तींची संख्या वृत्तालेखात दर्शविलेली आहे. त्यातील ट्रेनने प्रवास करणाऱ्या व्यक्तींची संख्या 168 आहे. यावरुन प्रश्न सोडवा :* ***(प्रश्न-क्रमांक 118 व 119)***




**118.** बसने प्रवास करणाऱ्या व्यक्तींची संख्या किती ?

(1) 308 (2) 354 (3) 118 (4) 236

**119.** मोटार सायकलपेक्षा बसने प्रवास करणाऱ्या व्यक्तींची संख्या कितीने कमी आहे ?

(1) 72 (2) 36 (3) 95 (4) 108

**120.** गणित अध्यापनातील दूरगामी उद्दिष्टांच्या स्पष्टीकरणाचा योग्य पर्याय कोणता ?

(1) अनिकेत दिलेल्या मापानुसार आकृत्या काढतो.

(2) अनुजा आलेखातील माहितीचा अर्थ लावते.

(3) स्पंदन भौमितिक साहित्याने सुंदर आकृत्या काढतो.

(4) मानसी आकृत्यांमधील फरक स्पष्ट करते.

## भाग - D : परिसर अभ्यास

**121.** "कमळाचे फूल सकाळी उमलते; तर निशिगंधाचे फूल रात्री उमलते." ही वनस्पतीची कोणत्या प्रकारची हालचाल आहे ?

(1) रसायन-अनुवर्तन (2) वृद्धी-असंलग्न (3) जलानुवर्ती (4) गुरुत्वानुवर्ती

**122.** कचऱ्यातील पदार्थांचा निसर्गतः विघटनासाठी लागणारा सर्वसाधारण कालावधी लक्षात घेता सर्वाधिक व सर्वात कमी कालावधी लागणाऱ्या पदार्थांची योग्य जोडी खालील पर्यायांपैकी कोणती ?

(1) थर्माकोल - लाकूड (2) प्लॅस्टिक - चामडी बूट

(3) थर्माकोल - चामडी बूट (4) प्लॅस्टिक - लाकूड

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**123.** खालीलपैकी योग्य विधान/विधाने कोणते/कोणती ?

(अ) हिऱ्यावर आम्ल किंवा अल्कली यांचा परिणाम होत नाही.

(ब) हिरा हे कार्बनचे अस्फटिक रूप आहे.

(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब)
(3) फक्त (अ) आणि (ब)
(4) (अ) आणि (ब) दोन्हीही नाही

**124.** शून्य अंश सेल्सिअस तापमानाच्या पाण्याचे तापमान वाढविल्यास खालील पर्यायांपैकी कोणता परिणाम दिसून येतो ?

(1) सुरुवातीला त्याची घनता वाढते; परंतु नंतर ती कमी होत जाते.
(2) सुरुवातीला त्याची घनता कमी होते; परंतु नंतर ती वाढत जाते.
(3) सुरुवातीपासून शेवटपर्यंत घनता वाढत जाते.
(4) सुरुवातीपासून शेवटपर्यंत घनता कमी होत जाते.

**125.** "सामान्यत: अणू विद्युतप्रभारदृष्ट्या उदासीन असतो" याचे योग्य कारण स्पष्ट करणारा संख्यादर्शक पर्याय खालीलपैकी कोणता ?

(1) प्रोटॉन < इलेक्ट्रॉन
(2) न्यूट्रॉन > इलेक्ट्रॉन
(3) न्यूट्रॉन = इलेक्ट्रॉन
(4) प्रोटॉन = इलेक्ट्रॉन

**126.** वनस्पतीमधील कोणता टाकाऊ पदार्थ मानवाला उपयुक्त आहे ?

(1) रॅफाइडस्
(2) कॅल्शिअम ऑक्झलेट
(3) निलगिरी तेल
(4) करडई तेल

**127.** जीवजन्माच्या 'जरायुज' पद्धतीतील प्राण्यांमध्ये सर्वसामान्यपणे कोणते वैशिष्ट्य आढळत नाही ?

(1) या प्राण्यांच्या अंगावर केस असतात.
(2) आसपासच्या पर्यावरणाशी ते पूर्णपणे अनुकूलित असतात.
(3) ते शीत रक्ताचे नसतात.
(4) ते प्राणी शरीराच्या तापमानावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत.

**128.** पर्यावरणवादी कार्यकर्ते राजेंद्रसिंह यांच्याशी संबंधित बाबी खालीलपैकी कोणत्या ?

(अ) तरुण भारत संघ
(ब) पाणी पंचायत
(क) पेड बचाओ, पेड लगाओ पदयात्रा
(ड) चिपको आंदोलन

(1) फक्त (अ) आणि (क)
(2) फक्त (ब) आणि (ड)
(3) फक्त (अ), (ब) आणि (क)
(4) फक्त (ब), (क) आणि (ड)

**129.** "खाद्यतेलाचे रूपांतर वनस्पती तुपात होते." त्यावेळी खालील पर्यायांपैकी कोणती क्रिया घडते ?

(1) हायड्रोजन मुक्त होतो.
(2) ऑक्सिजन मुक्त होतो.
(3) अभिक्रियाकारकाचे ऑक्साइड तयार होते.
(4) अभिक्रियाकारके ऑक्सिजन प्राप्त करतात.

Prepp
Your Personal Exams Guide

130. खालील पर्यायांपैकी अयोग्य विधान कोणते ?

(1) संप्रेरकाचे रक्तात मिसळणे, खोकणे या अनैच्छिक क्रिया आहेत.

(2) प्रतिक्षिप्त क्रिया या अनैच्छिक क्रिया नाहीत.

(3) एखाद्या गरम वस्तूला हात लावला की, तो लगेच मागे घेतला जातो ही अनैच्छिक क्रिया आहे.

(4) बोटाला सुई टोचली की, 'आई ऽ ग' हा उद्‌गार तोंडातून निघतो ही प्रतिक्षिप्त क्रिया आहे.

131. विद्युत दिव्याचे वैशिष्ट्य खालील पर्यायांपैकी कोणते ?

(1) विद्युत दिव्यात ऑक्सिजन असल्यामुळे तो जळत राहतो आणि प्रकाश पडतो.

(2) नायट्रोजन व अरगॉन या वायूंमुळे विद्युत दिव्यातील कुंडलाची कार्यक्षमता वाढते.

(3) विद्युत दिव्यात अत्यंत कमी द्रवणांक असणाऱ्या धातूचे कुंडल असते.

(4) विद्युत दिव्यात अत्यंत कमी गोठणांक असणाऱ्या धातूचे कुंडल असते.

132. खालील 'कारण' आणि 'परिणाम' यांचा अर्थ लक्षात घेऊन योग्य पर्याय निवडा :

**कारण** : (अ) सरडा शीत रक्ताचा प्राणी आहे.

**परिणाम** : (ब) सभोवतालच्या तापमानानुसार सरड्याला त्याच्या शरीराच्या तापमानावर नियंत्रण ठेवता येते.

(1) फक्त (अ) योग्य

(2) फक्त (ब) योग्य

(3) दोन्ही (अ) आणि (ब) योग्य

(4) (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य

133. उष्णतेच्या अभिसरण प्रवाहाचे उदाहरण नसलेला पर्याय कोणता ?

(1) समुद्राकडून जमीनीकडे खारे वारे वाहणे.

(2) कंदिलाची वात तेवत राहणे.

(3) सूर्याची उष्णता पृथ्वी पर्यंत पोहोचणे.

(4) शेगडीवर ठेवलेल्या भांड्यातील पाणी तापणे.

134. खालीलपैकी योग्य विधाने कोणती ?

(अ) आयोडीन हा अधातू आहे.

(ब) अधातूंना सहसा चकाकी नसते.

(क) आयोडीनला चकाकी असते.

(ड) आयोडीन हा धातू आहे.

(1) फक्त (अ) आणि (ब)

(2) फक्त (क) आणि (ड)

(3) फक्त (अ), (ब) आणि (क)

(4) फक्त (ब), (क) आणि (ड)

135. "विद्यार्थी साधनसामुग्री वाया न घालविता त्याचा प्रयत्नपूर्वक पुनर्वापर करतो" हे खालील पर्यायांपैकी कशाचे उदाहरण आहे ?

(1) विश्लेषणासंबंधीचा क्षमता विकास

(2) वर्गीकरणासंबंधीची अध्ययन निष्पत्ती

(3) निरीक्षण व त्याची मांडणी यासंबंधीचा अपेक्षित वर्तन बदल

(4) प्रयोगशीलतेसंबंधीचे अध्ययनदर्शक

Prepp
Your Personal Exams Guide

136. युरोपातील ख्रिस्ती धर्मातील 'प्रतिधर्म-सुधारणा' चळवळ म्हणजे काय ?

(1) कॅथॉलिक पंथाच्या अनुयायांनी धर्मगुरुंविरुद्ध केलेले बंड
(2) प्रॉटेस्टंट पंथांच्या अनुयायांनी पोपविरुद्ध केलेले बंड
(3) पोपच्या प्रेरणेने कॅथॉलिक पंथाच्या अनुयायांनी केलेले सामाजिक कार्य
(4) मार्टिन ल्युथरने प्रसिद्ध केलेला धर्मसुधारणा जाहिरनामा

137. गोपाळ हरी देशमुख यांच्याशी संबंधित नसलेली बाब खालील पर्यायांपैकी कोणती ?

(1) 'दिग्दर्शन' या साप्ताहिकातून शतपत्रांचे लेखन
(2) वाचनालयाची चळवळ
(3) विधवा विवाहाचा पुरस्कार
(4) 'लोकहितवादी' या टोपणनावाने लेखन

138. संस्था/संघटना आणि त्यांचे संस्थापक यांची योग्य जोडी दर्शविणारा पर्याय कोणता ?

| 'संस्था/संघटना' | | 'संस्थापक' |
|---|---|---|
| (अ) हिंदूस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन | – | (i) रासबिहारी बोस |
| (ब) आझाद हिंद सेना | – | (ii) सचिंद्रनाथ संन्याल |
| (क) हिंदूस्थान रिपब्लिकन असोसिएशन | – | (iii) सुभाषचंद्र बोस |
| (ड) इंडिया हाऊस | – | (iv) चंद्रशेखर आझाद |
| | – | (v) श्यामजी कृष्ण वर्मा |

(1) (अ) – (iv), (ब) – (iii), (क) – (i), (ड) – (ii),
(2) (अ) – (ii), (ब) – (i), (क) – (iv), (ड) – (v),
(3) (अ) – (iv), (ब) – (i), (क) – (ii), (ड) – (v),
(4) (अ) – (v), (ब) – (iii), (क) – (ii), (ड) – (i),

139. आझाद हिंद सेनेचे कोणते बोधचिन्ह होते ?

(1) पेटती मशाल
(2) चरख्याचे चित्र
(3) भरारी घेणारा फिनिक्स पक्षी
(4) झेप घेणारा वाघ

140. स्वराज्याचे शत्रू आणि त्यांच्या विरुद्ध संघर्ष केलेल्या शिवरायांच्या स्वामीनिष्ठ व्यक्ती यांची अयोग्य जोडी खालील पर्यायांपैकी कोणती ?

(1) शायिस्ताखान - फिरंगोजी नरसाळा
(2) दौलतखान - मुरारबाजी
(3) बहलोलखान - प्रतापराव गुजर
(4) सिद्दी मसऊद - बाजीप्रभू देशपांडे

141. *"दिल्ली झाली दीनवाणी / दिल्लीशाचे गेले पाणी ।*
*.................. राणी । भद्रकाली कोपली ॥"*

अशा शब्दात समकालीन मराठी कवी देवदत्त याने कोणाचे वर्णन केले आहे ?

(1) झाशीची राणी लक्ष्मीबाई
(2) अहिल्याबाई होळकर
(3) चांदबिबी
(4) महाराणी ताराबाई

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**142.** भारतीय राजमुद्रेवर खालीलपैकी कोणता/कोणते प्राणी आहे/आहेत ?

(अ) सिंह (ब) घोडा (क) बैल

(1) फक्त (अ) (2) फक्त (अ) आणि (ब)

(3) फक्त (अ) आणि (क) (4) तिन्ही (अ), (ब) आणि (क)

**143.** "परराज्यातील व्यक्तीची नेमणूक राज्याच्या राज्यपाल पदी केली जाते." याचे प्रमुख कारण खालील पर्यायांपैकी कोणते ?

(1) ही भारतीय संविधानातील तरतूद आहे.

(2) कोणत्याही व्यक्तीची तिच्याच राज्यात राज्यपाल म्हणून नेमणूक न करण्याचा प्रघात आहे.

(3) राज्याचे कायदेमंडळ गठीत करण्यासंबंधीची नियमावलीत तशी तरतूद आहे.

(4) राज्याचे कार्यकारी मंडळ गठीत करण्यासंबंधीच्या नियमावलीत तशी तरतूद आहे.

**144.** पंचायती राज व्यवस्थेतील ग्रामसभेचे वैशिष्ट्य नसणारे विधान कोणते ?

(1) गावातील सर्व आबालवृद्ध गावकऱ्यांच्या सभेला ग्रामसभा म्हणतात.

(2) ग्रामसभा बोलविण्याची जबाबदारी सरपंचाची असते.

(3) ग्रामपंचायतीच्या विकासाच्या योजनांना ग्रामसभा मान्यता देते.

(4) ग्रामपंचायती संबंधीच्या मूळ कायद्यात ग्रामसभेच्या स्थापनेविषयी तरतूद होती.

**145.** भारताच्या उत्तर भूभागावरून समुद्राकडे वाहणाऱ्या कोरड्या वाऱ्यांमुळे खालील पर्यायांपैकी कोणत्या ठिकाणी पाऊस पडतो ?

(1) कारवार (2) कवरत्ती (3) मच्छलीपट्टण (4) मंगळूर

**146.** पर्वतरांगा व भारतातील सर्वात उंच शिखर यांची अयोग्य जोडी कोणती ?

(1) सातपुडा - अस्तंभा (2) पश्चिम घाट - अनैमुडी

(3) अरवली - गुरुशिखर (4) हिमालय - के-२

**147.** प्रमाणवेळेनुसार ग्रिनिच शहरात सोमवार रात्रीचे दहा वाजले असतील; तर त्याचवेळी भारतात किती वाजलेले असतील ?

(1) सोमवार - संध्याकाळचे साडेचार (2) मंगळवार - पहाटेचे साडेतीन

(3) सोमवार - पहाटेचे साडेतीन (4) मंगळवार - संध्याकाळचे साडेचार

**148.** सापुतारा : गुजरात : : पाल : ?

(1) महाराष्ट्र (2) मध्य प्रदेश (3) आसाम (4) हिमाचल प्रदेश

**149.** भूषण संगणक अभियंता, मनिषा शिक्षिका, मिलिंद लघुउद्योजक आणि मनाली पोल्ट्री व्यावसायिक आहे; यावरुन चतुर्थक व्यवसाय करणारे कोण ?

(1) मनिषा (2) मनाली (3) मिलिंद (4) भूषण

**150.** राष्ट्रीय उद्याने असलेला महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा गट कोणता ?

(1) नागपूर - ठाणे - रायगड (2) गोंदिया - गडचिरोली - रायगड

(3) चंद्रपूर - नागपूर - गोंदिया (4) गडचिरोली - ठाणे - चंद्रपूर